**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ३१ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१०५** **दिनांक : १५/०१/२०२५**
**विभाग** : बांधकाम विभाग

---

**प्रस्तावाचा विषय :-** नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजना सन २०२४-२०२५ विकास कामास मा.जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांची प्रशासकीय मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणे बाबत

---*---

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजना २०२४-२०२५ अंतर्गत रक्कम रूपये १५,८३,८४,४२३/- इतके अनुदान अनुज्ञेय आहे. त्यानुसार ५१ विकास कामांचा रक्कम रू.१५,८१,९७,९६६/- खर्चाचा प्रस्ताव संदर्भ क्र. ४ अन्वये मा.जिल्हाधिकारी,अहिल्यानगर यांचेकडेस प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केला होता. त्यामधील अ.क्र. १३ चे रक्कम रू. १९,९९,८७३/- चे काम जागेचा उतारा नसल्याकारणाने रद्द करण्यात येवून रक्कम १५,६१,९८,०९३/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली.

सदर प्रस्तावातील अ.क्र. ४७ वरील कामात बदल झाला असल्याने (अंदाजपत्रकीय रक्कम रू. ५९,८३,३१७/-) सदर काम रद्द करून खालील नमुद कामे मंजूर निधीच्या मर्यादेत प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| प्रस्तावित केल्याप्रमाणे रक्कम | प्रशासकीय मान्यता रक्कम | २ रद्द कामे वगळता अंदाजपत्रकानुसार रक्कम | उर्वरित शिल्लक (रद्द केलेल्या कामासह ) (१-२) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १५,८१,९७,९६६/- | १५,६१,९८,०९३/- | १५,०२,१४,७७६/- | ७९,८३,१९०/- |

रदर रकाना क्र. ४ मध्ये नमुदप्रमाणे रकमेच्या मर्यादेत खाली नमुद विकास काम या विभागाकडून प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | अहिल्यानगर मनपा हद्दीतील शिवाजीनगर पाण्याची टाकी ते गट क्र. १८७/२ पर्यत एच.डी.पी.ई. पाईप लाईन टाकणे | १०,०६,६२४/- |
| २ | प्रभाग क्र. ८ मध्ये वारूळाचा मारूती रोड वरील खंडोबा मंदिर ते मुख्य नाल्यापर्यत ४५० एम.एम.आर.सी.सी. पाईप गटर करणे | ३६,४२,६६१/- |
| ३ | प्रभाग क्र. ८ कल्याण रोड वरील गणेश नगर पाण्याची टाकी ते खंडोबा मंदिर पर्यत २०० एम.एम.डी.आय.तसेच १६० एम.एम.व ११० एम.एम.एच.डी.पी.ई.पाईप लाईन टाकणे | ३३,३३,८८४/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | एकूण रक्कम | ७९,८३,१६९/- |



तरी वर नमुद विकास कामांचा प्रस्ताव नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजना २०२४-२०२५ अंतर्गत रक्कम रू.७९,८३,१६९/-(अक्षरी रूपये एकोणऐंशी लाख त्र्याऐंशीहजार एकशे एकोणसत्तर मात्र ) खर्चाचा प्रस्ताव तसेच या योजने अंतर्गत अधिकचा निधी मागणी कामी खालील कामे प्रस्तावित करण्यात यावी.

| अ.नं. | कामाचे नांव | तांत्रिक मान्यता रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२ गुरूकुल सोसायटी अंतर्गत अडाणे घर ते लोटके घर ते गुंदेचा घरापर्यंत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे | ६५,००,०००/- |
| २ | प्रभाग क्र.२ मध्ये सनी पॅलेस ते ओढयापर्यंत ३०० एम.एम.गटर करणे | ९,९९,२४७/- |
| ३ | अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील गुलमोहर रोड वरील सुरभी हॉस्पीटल ते कुष्ठधाम रोड पर्यतच्या रस्त्यावर विद्युतीकरण करणे | ७३,६८,४३४/- |
| | | १,४८,६७,४८१/- |

वरील प्रमाणे ७९,८३,१६९/- व १,४८,६७,४८१/- असे एकूण २,२८,५०,६५०/-चा खर्चाचा प्रस्ताव सदर योजने अंतर्गत सादर करणेकामी सदर विकास कामांना तांत्रिक मान्यता प्रदान करून मा.जिल्हाधिकारी ,अहिल्यानगर (न.पा.) यांचेकडेस प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणेस प्रशासक सर्व साधारण सभा मान्यता देत आहे.

**निर्णय :-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ३१ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१०६** **दिनांक : १५/०१/२०२५**

**विभाग** : आस्थापना विभाग

**प्रस्तावाचा विषय :-** श्री विजयकुमार शिवाजी दिवटे, वाहन चालक यांनी सादर केलेले त्यांची आई श्रीमती मुक्ताबाई शिवाजी दिवटे यांचे वैद्यकिय खर्चाचे परतावा देयक अदा करणे बाबत

---*---

**ठराव :-** विभागाने सादर केलेल्य प्रस्तावानुसार अहिल्यानगर महानगरपालिकेतील श्री.विजयकुमार शिवाजी दिवटे वाहन चालक यांनी त्यांच्या आई श्रीमती मुक्ताबाई शिवाजी दिवटे यांचे वैद्यकीय खर्चाचे प्रतिपुर्ती बिल सादर केले असून सादर केलेले वैदयकीय प्रतिपुर्ती देयक रू. रू.३,००,०००/- पेक्षा जास्त असल्याने सदरच्या प्रस्तावास मा.महासभेची मंजुरी आवश्यक आहे.

तरी श्री.विजयकुमार शिवाजी दिवटे वाहन चालक त्यांची आई श्रीमती मुक्ताबाई शिवाजी दिवटे यांचे वैदयकीय प्रतिपुर्ती देयक रक्कम रूपये ३,४५,१९४/- (अक्षरी रूपये तीन लाख पंचेचाळीस हजार एकशे चौ-यान्नव फक्त) इतकी होत असुन सदरची रक्कम संबंधीतास अदा करणेस मा.प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ३१ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१०७** **दिनांक : १५/०१/२०२५**
**विभाग : प्रकल्प विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय :-** प्रोफेसर कॉलनी फायनल प्लॉट नंबर १२९ (पैकी) या ठिकाणी शॉपिंग सेंटर विकसीत करणे

---*---

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार प्रोफेसर कॉलनी फायनल प्लॉट नंबर १२९ (पैकी)येथे एफ.बी.टी. तत्वावर शॉपिंग सेंटर विकसीत करणेचे काम बांधकाम विभागामार्फत प्रस्तावित होते. सदर कामासाठी बांधकाम विभागामार्फत निविदा मागविण्यात आली होती. परंतु कार्यारंभ आदेश देण्यात आलेला नाही. यानंतर बरासचा कालावधी उलटून गेला आहे.

सद्यस्थितीत प्रोफेसर कॉलनी फायनल प्लॉट नं. १२९ (पैकी )या ठिकाणी शॉपिंग सेंटर विकसीत करणेचे काम प्रकल्प विभागामार्फत करणेसाठी मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे संदर्भ क्र. १ अन्वये आदेश प्राप्त आहेत. त्यानुसार बांधकाम विभागामार्फत प्रोफेसर कॉलनी फायनल प्लॉट नं. १२९(पैकी) याठिकाणी शॉपिंग सेंटर विकसीत करणेच्या फाईल्स प्रकल्प विभागाकडेस संदर्भ क्र. २ अन्वये हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत.

सदर फाईलची तपासणी केली असता प्रोफेसर कॉलनी फायनल प्लॉट नं. १२९ (पैकी) या ठिकाणी शॉपिंग सेंटर विकसीत करणे करिता प्रथमतः मा.महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच सदर कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) यांची नेमणुक करणे आवश्यक आहे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) यांनी सदर प्रकल्पाचे आराखडे तयार करणे अंदाजपत्रक तयार करणे, निविदा प्रक्रिया राबविणे कामी मनपास सहकार्य करणे व काम सुरू झालेनंतर सुपरविझन करणे अपेक्षित आहे.

नेहरू मार्केट चितळे रोड सि.स.नं. २०८ या आरक्षण क्र. २१६ या जागेमध्ये भाजी मार्केट व व्यापारी संकुल विकसीत करणे या कामासाठी मा.स्थायी समिती सभा क्र. ०१, विषय क्र.०९ दि. १८/०४/२०२२ अन्वये तयार करणेत आलेल्या पॅनल वरील स्पॅनेक्स एईसी यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) म्हणून नेमणुक करण्यात आली आहे.

त्याच अनुषंगाने प्रोफेसर कॉलनी फायनल प्लॉट नंबर १२९ (पैकी) येथे शॉपिंग सेंटर विकसीत करिता स्पॅनेक्स एईसी यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) म्हणून नेमणुक करणे संयुक्तीक राहील

१) प्रोफेसर कॉलनी फायनल प्लॉट नंबर १२९ (पैकी) या ठिकाणी शॉपिंग सेंटर विकसीत करणे मा.महासभेची मान्यता देण्यात येत आहे.

२) प्रोफेसर कॉलनी फायनल प्लॉट नंबर १२९ (पैकी) या ठिकाणी शॉपिंग सेंटर विकसीत करिता मा.स्थायी समिती सभा क्र. ०१,विषय क्र.०९ दि.१८/०४/२०२२ अन्वये तयार करणेत आलेल्या पॅनल वरील स्पॅनेक्स एईसी यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) म्हणून नेमणूक करणेस प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे. विभागाने याबाबत पुढील कार्यवाही करावी.

**निर्णय :-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकःएमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ३१ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१०८** **दिनांक : १५/०१/२०२५**

**विभाग** : पाणी पुरवठा विभाग

---

**प्रस्तावाचा विषय :-** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या पाणी पुरवठा योजना स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टिने घरगुती वापर पाणी पट्टीचे दरात वाढ करणे बाबत

---*---

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्या नुसार अहिल्यानगर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेता चालू वर्षी पाणीपट्टीसह इतर करांचे अपेक्षित वसुली होत नसल्याने महानगरपालिकेची शाश्वत उत्पन्न कमी होत असल्याने प्रथमदर्शनी निदर्शनास येत आहे. परिणामी शहर पाणी योजनेपोटी वीज वितरण कंपनीचे दर महिन्याची वीज बीले वेळेत अदा होत नसल्याने शहर पाणी पुरवठा योजनेची वीज बीले वेळेत भरणेस वारंवार अडचणी निर्माण होत आहे. वीज बीले वेळेत न भरली गेल्यास भविष्यात वीज कपातीचे संकट कायम आहे. अशा परिस्थितीत घरगुती वापर पाणीपट्टीचे दरात वाढ करणे अत्यंत गरजेचे व आवश्यक आहे.

पाणी पुरवठा योजना स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टिकोनातून पाणीपट्टी दरवाढ आवश्यक व क्रमप्राप्त असल्याने सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकीय मा.महासभेसमोर पाणीपट्टीचे दरात वाढ करणे बाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावापैकी घरगुती वापर पाणीपट्टी दरवाढ वगळता व्यावसायिक वापर, औदयोगिक वापर, इत्यादीचे पाणी दरामध्ये एप्रिल २०१६ पासून दरवाढ लागू करण्यात आलेली आहे. परंतु उत्पन्न वाढीत फारसा फरक पडलेला नाही.

घरगुती वापर नळ कनेक्शन धारकांची संख्या मोठया प्रमाणात असल्याने उत्पन्न वाढीच्या दृष्टिकोनातून सन २०१८-२०१९ पासून घरगुती वापर पाणीपट्टीचे दरात वाढ करणे करिता विषयांकित बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या शिफारशीने मा.महासभे समोर चर्चेसाठी ठेवून तेथील निर्णयानुसार पुढील कार्यवाही करणे बाबतचा प्रस्ताव दरवर्षी मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहे.

परंतु घरगुती वापर पाणीपट्टीचे दरात वाढ करणे प्रकरणी मागील ०६ वर्षापासून अदयाप ठोस निर्णय झालेला नाही.

मुळातच अहिल्यानगर महानगरपालिका अस्तित्वात आले नंतर सन २००३ ला तत्कालीन मा.प्रशासक यांनी दरवाढी बाबत निर्णय घेवून तत्कालीन परिस्थितीत घरगुती पाणी ग्राहकांची (अर्धा इंची नळ कनेक्शन करिता ) रू. ८०६/- मध्ये दरवाढ करून रू. १५००/- इतकी पाणीपट्टी लागू केलेली होती. व तेव्हापासून आजतागायत २१ वर्ष इतक्या प्रदिघ कालावधीनंतरही पाणी पट्टीचा तोच दर कायम आहे.

२१ वर्षे इतक्या प्रदीर्घ कालावधी नंतरही पाणीपट्टीचा तोच दर कायम असताना शहर पाणी पुरवठा योजनेसह वितरण व्यवस्था चालविणे करिता येणारा खर्च प्रामुख्याने वीज बील , दैनंदिन देखभाल व दुरूस्तीची कामे, आस्थापना खर्च इ. खर्चाचे अवलोकन केले असता यामध्ये कित्येक पटीने वाढ झाल्याचे निदर्शनास येत आहे.

अहिल्यानगर महानगरपालिके कडील एकूण नळ कनेक्शन, त्यामधून मिळणारे उत्पन्न व घरगुती नळ कनेक्शनमध्ये प्रस्तावित दरवाढी नुसार मिळणारे एकुण उत्पन्नाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | वापर | कनेक्शनची साईज ' " ' मध्ये | चालू दर | प्रभाग समिती क्र.१ | प्रभाग समिती क्र.२ | प्रभाग समिती क्र.३ | प्रभाग समिती क्र.४ | एकुण कनेक्शन | चालू दरानुसार पात्र उत्पन्न | प्रस्तावित दर | प्रस्तावित दराने होणारे उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 4 |
| 1 | घरगुती कनेक्शन | १/२" | 1500 | 29756 | 10665 | 6226 | 16779 | 63426 | 95139000 | 3000 | 190278000 |
| | | ३/४" | 3000 | 31 | 480 | 79 | 321 | 911 | 2733000 | 6000 | 5466000 |
| | | १" | 6000 | 3 | 3 | 3 | 15 | 24 | 144000 | 10000 | 240000 |
| | | | | 29790 | 11148 | 6308 | 17115 | 64361 | 98016000 | | 195984000 |
| 2 | व्यापारी कनेक्शन | १/२" | 10000 | 139 | 184 | 33 | 879 | 1235 | 12350000 | नाही | 12350000 |
| | | ३/४" | 20000 | 10 | 30 | 15 | 80 | 135 | 2700000 | नाही | 2700000 |
| | | १" | 40000 | 1 | 0 | 3 | 16 | 20 | 800000 | नाही | 800000 |
| | | | | 150 | 214 | 51 | 975 | 1390 | 15850000 | | 15850000 |
| 3 | औद्योगिक कनेक्शन | १/२" | 20000 | 0 | 1 | 8 | 0 | 9 | 180000 | नाही | 180000 |
| | | ३/४" | 40000 | 0 | 0 | 4 | 0 | 4 | 160000 | नाही | 160000 |
| | | १" | 80000 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 80000 | नाही | 80000 |
| | | | | 0 | 1 | 13 | 0 | 14 | 420000 | | 420000 |
| 4 | हद्दी बाहेर | १/२" | 3000 | 293 | 0 | 0 | 0 | 293 | 879000 | 6000 | 1758000 |
| | | ३/४" | 6000 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | १" | 12000 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | | 293 | 0 | 0 | 0 | 293 | 879000 | | 1758000 |
| 5 | मिटरप्रमाणे नळ कनेक्शन | मुख्य जलवाहिनी घरगुती | 10 | | | | | 16 | 2500000 | 20 | 5000000 |
| | | शहर घरगुती वापर | 5 | | | | | 18 | 500000 | 10 | 100000 |
| | | मुख्य जलवाहिनी व्यावसायिक | 150 | | | | | 17 | 16200000 | नाही | 16200000 |
| | | शहर व्यापारी | 20 | | | | | 21 | 4000000 | नाही | 4000000 |
| | | शहर औद्योगिक | 30 | | | | | 6 | 1200000 | नाही | 1200000 |
| | | | | | | | | 78 | 24400000 | | 26500000 |
| | | | एकुण | 30233 | 11363 | 6372 | 18090 | 66136 | 139565000 | | 240512000 |

वरिल प्रमाणे सन २०२५-२०२६ पासुन घरगुती पाणी वापर ग्राहकांचे पाणीपट्टीमध्ये दरवाढ लागू करणेस मा.प्रशासक स्थायी समिती यांनी मा.स्थायी समिती ठराव क्र.३६३ दि.०७/०१/२०२५ ठरावान्वये महासभेकडे मान्यता मिळणे कामी शिफारशी केली आहे.

तरी, सन २०२५-२०२६ पासून घरगुती पाणी वापर ग्राहकांचे पाणीपट्टीमध्ये दरवाढ लागू करणेस मा.प्रशासक यांनी केलेल्या शिफारशी मधील खालील प्रमाणे पाणीपट्टी दरवाढ राहिल.

| अ. नं. | वापर | कनेक्शन ची साईज ' " ' मध्ये /परिमान | चालू दर | मा.महासभेने मान्यता दिलेला दर |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| १ | घरगुती कनेक्शन | १/२" | १५००/- | दि.१/०४/२०२५ पासून रू.२४००/- तसेच त्यापुढील प्रत्येक आर्थिक वर्षा करीता रू. २००/- दरवाढ राहील |
| २ | घरगुती कनेक्शन | ३/४" | ३०००/- | दि.१/०४/२०२५ पासून रू.४८००/- तसेच त्यापुढील प्रत्येक आर्थिक वर्षा करीता रू. २००/- दरवाढ राहील |
| ३ | घरगुती कनेक्शन | १" | ६०००/- | दि.१/०४/२०२५ पासून रू.१०,०००/- तसेच त्यापुढील प्रत्येक आर्थिक वर्षा करीता रू. २००/- दरवाढ राहील |
| ४ | घरगुती कनेक्शन हद्दी बाहेर | १/२" | ३०००/- | दि.१/०४/२०२५ पासून रू.४८००/- तसेच त्यापुढील प्रत्येक आर्थिक वर्षा करीता रू. २००/- दरवाढ राहील |
| ५ | मुख्य जलवाहिनी मिटर प्रमाणे घरगुती वापर | -- | १०/- | दि.१/०४/२०२५ पासून रू.२०/-प्रति हजार लिटर तसेच त्यापुढील प्रत्येक आर्थिक वर्षा करीता रू. ५/- दरवाढ राहील |
| ६ | शहर मिटर प्रमाणे घरगुती वापर | -- | ५/- | दि.१/०४/२०२५ पासून रू.१०/-प्रति हजार लिटर तसेच त्यापुढील प्रत्येक आर्थिक वर्षा करीता रू. २/- दरवाढ राहील |
| ७ | प्रस्तावित घरगुती पाणीपट्टी दरवाढीस ज्या नळजोड धारकांचा विरोध राहील,अशा नळजोड धारकांना मीटर वापर पध्दतीने प्रचलित दरा प्रमाणे पाणी वापर करणेस अनुमती देण्यात यईल. | | | |

वरील प्रमाणे पाणीपट्टी मध्ये वाढ करणेस तसेच सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षापासून पाणीपट्टी आकारणी करणेस मा.प्रशासक सर्वसाधारण सभा मंजुरी देत आहे. विभागाने या बाबत कार्यवाही करावी.

**निर्णय :-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक:एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,